श्री.विठ्ठल रूक्मिणी मंदिरे समिती, पंढरपूर

<u>छपाई कामाची जाहीर निविदा.</u>

देणगी विभागासाठी देणगी पावती पुस्तके व विविध प्रकारचे रजिस्टर छपाई कामाची जाहीर निविदा मागविण्यात येत आहे. या संबंधीची माहिती, अटी, शर्ती व निविदा फॉर्म तुकाराम भवन, पंढरपूर येथे आणि www.vitthalrukminimandir.org या वेबसाईटवर उपलब्ध आहेत. इकडील नमूना फॉर्ममध्येच निविदा भरून देणेची आहे. तसेच अनामत रक्कम रू.२५,०००/—डी.डी./रोख स्वरुपात भरणे आवश्यक आहे. सिलबंद निविदा कार्यकारी अधिकारी, श्री.विठ्ठल रूक्मिणी मंदिरे समिती, पंढरपूर यांचे नावे दिनांक ०६/०४/२०१६ रोजी सायं. ५:०० वाजेपर्यंत पोहोचेल अशी पाठवावी. प्राप्त निविदा दिनांक ०६/०४/२०१६ रोजी तुकाराम भवन येथे सायं ५:०० वा. उघडल्या जातील.

क्र.देणगी विभाग/कावि/०२४/२०१६ दि.२२/०३/२०१६

सही XXX

कार्यकारी अधिकारी

(संपर्क क्र. ०२१८६—२२३५५०,
९४२२०१५६९१, ९६६५३९२८०२)

# श्री.विठ्ठल रूक्मिणी मंदिरे समिती, पंढरपूर

## निवीदा फॉर्म

देणगी पावती पुस्तके व रजिस्टर छपाई कामाची जाहीर निविदा

प्रति,
मा.कार्यकारी अधिकारी,
श्री.विठ्ठल रूक्मिणी मंदिरे समिती,
पंढरपूर.

विषयः— देणगी पावती पुस्तके व रजिस्टर छपाई कामाचे दरपत्रक.

ठेकेदाराचे पूर्ण नाव :— श्री.——————————————————————————

पूर्ण पत्ता :— ——————————————————————————

——————————————————————————

मोबाईल कं.:— ——————————————————————————

महोदय,

श्री.विठ्ठल रूक्मिणी मंदिर समिती, पंढरपूरचे वतीने देणगी पावती पुस्तके व रजिस्टर छपाई कामाची दिनांक २३/०३/२०१६ रोजीचे दैनिक पुण्यनगरी, सोलापूर या वर्तमानपत्रामध्ये प्रसिध्द झालेल्या जाहीर निविदे प्रमाणे सदर कामाचे दरपत्रक खालीलप्रमाणे सादर करीत आहेत.

| **अ क्र** | **तपशील** | **दर रू. (प्रति पुस्तक / रजिस्टर) सर्व करासहीत** |
|---|---|---|
| १ | देणगी पावती पुस्तक (प्रत्येकी १०० पावतीचे डयुप्लीकेटमध्ये) | |
| २ | विविध प्रकारची १०० पानी रजिस्टर (साईज ३२से.मी.X२१से.मी.) | |

सदर दराने २३ एप्रिल २०१६ ते ३० एप्रिल २०१७ या कालावधीत देणगी पावती पुस्तके व रजिस्टर छपाई करून पुरवठा करणेस मी बांधील राहील. तसेच याबाबतच्या आपणाकडून देण्यात आलेल्या अटी व शर्ती मला मान्य असून त्यासंबंधीचे जरूर ते प्रतिज्ञापत्र स्टॅम्पपेपरवर करून देण्यास तयार आहे. रू.२५,०००/— अनामत रकमेचा डी.डी./पावतीची झेरॉक्स प्रत सोबत जोडली आहे. तरी वर नमुद दरपत्रकाप्रमाणे देणगी पावती पुस्तके व रजिस्टर छपाई करून पुरवठा करणेचे काम मला मिळण्यास विनंती आहे.

दिनांक /०४/२०१६ पुरवठाधारकाची सही

सोबत खालील कागदपत्रे जोडलेली आहेत

१. अनामत रक्कमेचा डी.डी/ रोखीच्या पावतीची झेरॉक्स प्रत.
२. पूर्वी देणगी पावती पुस्तके व रजिस्टर छपाई करून पुरवठा केलेल्या कामाची अनुभवाची प्रमाणपत्रे.
३. स्वत:च्या ओळखपत्राची झेरॉक्स प्रत. (उदा. पॅनकार्ड, मतदान कार्ड व आधारकार्ड)
४. छपाई कामासाठी आवश्यक असलेल्या शासकीय परवान्यांच्या प्रती.

## श्री.विठ्ठल रूक्मिणी मंदिरे समिती, पंढरपूर
## देणगी पावती पुस्तके व रजिस्टर छपाई कामाची जाहीर निविदा

माहिती, अटी व शर्ती खालीलप्रमाणे.....

१. नमूना निविदा फॉर्म कार्यालयीन वेळेत तुकाराम भवन येथे उपलब्ध होवून मिळतील. तसेच www.vitthalrukminimandir.org या वेबसाईटवर मिळतील. निविदा फॉर्म स्वतंत्र लिफाप्यात सिलबंद करून सादर करणे आवश्यक आहे. लिफाप्यावर ठेकेदाराचे नाव व पूर्ण पत्ता आणि निविदा देणगी पावती पुस्तके व रजिस्टर छपाई करून पुरवठा करणे कामासाठी भरलेली आहे, असा सविस्तर तपशिल नमुद करावा. निविदा समक्ष तुकाराम भवन येथे सादर कराव्यात किंवा रजिस्टर पोस्टाने पाठवावे. उशीरा आलेल्या निविदा विचारात घेतल्या जाणार नाहीत.

२. अनामत रक्कम रू.२५,०००/–डी.डी./रोख स्वरुपात भरणे आवश्यक आहे. डी.डी. 'कार्यकारी अधिकारी, श्री.विठ्ठल रूक्मिणी मंदिरे समिती, पंढरपूर' यांचे नावे काढावा.

३. पुरवठादाराने निविदा फॉर्ममध्ये नमुद केलेल्या दराने २३ एप्रिल २०१६ ते ३० एप्रिल २०१७या कालावधीत देणगी पावती पुस्तके व रजिस्टर छपाई करून पुरवठा इकडील मागणी प्रमाणे करणे आवश्यक आहे.

४. देणगी पावती पुस्तके व रजिस्टर छपाई कामाचा तपशिल खालीलप्रमाणे आहे.

| अ. क्र. | तपशील | अंदाजे छपाई करावे लागणारी देणगी पावती पुस्तके व रजिस्टर (नग) |
|---|---|---|
| १ | रूपये १००० | १० |
| २ | रूपये ५०० | २० |
| ३ | रूपये १०० | २००० |
| ४ | रूपये ५० | २००० |
| ५ | रूपये २० | २००० |
| ६ | रूपये १० | २०० |
| ७ | कोरी पावती पुस्तके | १०० |
| ८ | अन्नछत्र पुस्तके | १०० |
| ९ | विविध प्रकारची १०० पानी रजिस्टर (साईज ३२से.मी.X२१से.मी.) | ३०० |

५. मंदिर समितीने ठरवून दिलेल्या अथवा निश्चित केलेल्या नमुन्यांतच देणगी पावती पुस्तके व रजिस्टर छपाई पुरवठा करणे आहे. (नमुना पावती पुस्तके व रजिस्टर देणगी विभागाकडे पाहावयास मिळतील)

६. देणगी पावती पुस्तके व रजिस्टर चांगल्या गुणवत्तेची असणे आवश्यक आहे.

७. देणगी पावती पुस्तके व रजिस्टर छपाई मध्ये व त्यासाठी वापरण्यात आलेल्या कागदामध्ये अथवा बांधणीमध्ये दोष आढळून आलेस ठेकेदारास जबाबदार धरणेत येईल. प्रस्तुतकामी दुबारा छपाई करण्याचे झालेस ती ठेकेदारांनी स्व:खर्चाने करून देणेची आहे.

८. देणगी पावती पुस्तके व रजिस्टर छपाईची परवानगी असलेबाबत सर्व प्रकारच्या शासकिय परवान्याच्या प्रती निविदा अर्जासोबत जोडणे आवश्यक आहे.

९. सदर मालाचा पुरवठा मंदिर समितीचे मागणीनुसार मुदतीत करणेचा आहे. त्यास विलंब झालेस पुरवठाधारकास जबाबदार धरून मालाच्या किमतीच्या ५ टक्के पर्यंत दंड आकारण्यात येईल.

१०. माल खराब असल्याचे आढळून आलेस पुरवठा धारकास जबाबदार धरणेत येईल व त्याचे बील अदा केले जाणार नाही.

११. पुरवठा करण्यात आलेल्या मालाची प्रत व प्रमाण संबंधित विभागाकडून मोजणी व तपासणी करून खात्री झाले खेरीज बील अदा केले जाणार नाही.

१२. देणगी पावती पुस्तके व रजिस्टर पुरवठा करणेचे ठिकाण देणगी विभाग, पंढरपूर येथे करणे आवश्यक आहे.

१३. माल वाहतुकी दरम्यान झालेल्या कोणत्याही दुर्घटनेस निविदाधारक जबाबदार राहील.

१४. सदर कामाचे मंजुर दराव्यतिरिक्त कोणताही कर अदा केला जाणार नाही. तसेच सदर कामाचे बिल अदा करताना आयकर कपात केली जाईल.

१५. सदर कामासाठी कोणत्याही प्रकारची ॲडव्हान्स रक्कम अदा केली जाणार नाही.

१६. समिती वेळोवेळी जे निर्देश देईल अथवा अटीत जे बदल करेल ते पुरवठाधारकांस बंधनकारक राहील.

१७. प्रशासकीय व अन्य कारणास्तव निविदा कोणत्याही स्तरावर रद्द करण्याचा अधिकार मंदिर समितीने राखुन ठेवलेला आहे.

१८. सदर कामासंबंधी काही वाद उद्‌भल्यास त्यासाठी न्यायालयीन कार्यक्षेत्र पंढरपूर हे राहील.

१९. वरील कोणत्याही एका अटी व शर्तीचा भंग झालेस पुरवठादारास जबाबदार धरणेंत येईल व मंजूर निविदा कोणत्याही क्षणी रद्द केली जाईल.

२०. निविदा ज्यांचे नांवे मंजूर झालेली आहे त्यांनी रक्कम रूपये १००/— चे स्टॅम्प पेपरवर सर्व अटी व शर्ती मान्य असलेबाबतचे (affidivit) प्रतिज्ञापत्र करून देणे आवश्यक आहे.

———————‘‘————————